नागपूर शहरातील **सोनेगांव** **तलावाच्या** पर्यावरण संवर्धनासाठी महानगरपालीकेकडून राबवण्यात येणा-या प्रकल्पातील कामांच्या खर्चास **अनुदान वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण विभाग, मंत्रालय,**

शासन निर्णय क्रमांक: रासयो-२०१०/प्र.क्र.१७/ता.क. ३

नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक: १९ जानेवारी, २०१२.

वाचा:- १) या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.१७ मार्च, २०१०, दि.२८ एप्रिल, २०१० व समक्रमांकाचा शुध्दीपत्रक दि.३० मार्च, २०१० व दि.०१ जानेवारी, २०१०

२) नागपूर महानगरपालिकेची दि.२ जानेवारी, २०१२ चा इमेल पत्र.

**प्रस्तावना:-**

राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत नागपूर महानगरपालीका, नागपूर यांचेमार्फत प्राप्त सोनेगांव तलावाच्या प्रस्तावास संदर्भाधीन दि.१७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. संदर्भाधीन तलावाच्या मंजूर काम करण्यासाठी संदर्भाधीन दि.१७ मार्च, २०१०, दि.२८ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे रू.१२५.०० लाख एवढे रक्कम मुक्त करण्यात आली आहे. सदर रक्कमेचा पुर्णपणे विनियोग झाल्या बाबत नागपूर महानगरपालिकेने उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे.

उपरोक्त उपयोगिता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने नागपूर शहरातील सोनेगांव तलावाच्या पर्यावरण संवर्धनासाठी निधी मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नागपूर शहरातील सोनेगांव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी मंजूर एकुण रु. ३२४.८४ लाखापैकी अनुज्ञेय राज्य हिस्याचे ७० टक्के म्हणजेच रुपये २२७.३९ लाखापैकी, दि.१७ मार्च, २०१०, दि.२८ एप्रिल, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे रू.६३.०० लाख मुक्त करण्यात आलेले आहे. आता **या शासन निर्णयाद्वारे पुढील हप्ता म्हणून रुपये १२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त)** आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना वितरीत / मुक्त करण्यास संदर्भाधीन दिनांक १७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. यासाठी **आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर, (Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur) यांचे नावे रुपये १२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त ) एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.**

३. "नागपूर महानगरपालिकेस अदा करावयाचा रू.१२५.०० लाख अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून **आयुक्त,नागपूर महानगरपालिका, नागपूर** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री.दे.के.मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.श्या.ना.धकाते, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर** यांना **रू.१२५.०० लाख (अक्षरी रूपये एक कोटी पंचवीस लाख फक्त)** अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर खर्च मागणी क्र. यू-४,३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण-०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना-(३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०११-१२ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात राज्य सरोवर संबर्धन योजनासाठी एकूण रू.८००.०० लक्ष एवढी तरतुद मंजुर व अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/ प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.२१ सप्टेंबर, २०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०१२०१००७१३२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(द.के.मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
जिल्हाधिकारी, नागपूर .
आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर.
संचालक, नगरपालिका प्रशासन वरळी, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हककदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प -७, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, कार्यासन-१४६२, मंत्रालय, मुंबई.
रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.